मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# कौशल्यम विकासाला चालना देणारे

## महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांचे मत

**पिंपरी-चिंचवड**

**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** कौशल्यम हे शहरातील तरुणांना सक्षम बनविण्यासाठी आणि शाश्वत आर्थिक विकासाला चालना देण्याच्या वाटचालीतील एक महत्वाचे पाऊल आहे. आपल्या शहराच्या उज्वल भविष्यासाठी लागणा-या सामूहिक कृतीचे महत्त्व अधोरेखित करणारा हा एक पथदर्शी उपक्रम असल्याचे मत आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी व्यक्त केले. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंग यांनी निगडी येथील लाईटहाऊसच्या आवारात आयोजित केलेल्या एका विशेष कार्यक्रमात कौशल्यम् युथ अँड बिझनेस ग्रोइंग टुगेदर अर्थात युवक आणि उद्योग यांचा एकत्रित



विकास या महत्वपूर्ण उपक्रमाची घोषणा केली त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निठकंठ पोमण, उप आयुक्त अजय चारठाणकर, मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष दिपक करंदीकर, संदीप मोदी, विविध कंपन्यांचे व्यवस्थापक लाईटहाऊस कम्युनिटीज फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. गणेश नटराजन, ग्लोबल डेव्हलपमेंट इनक्यूबेटरच्या अन्नू मेहता, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक उपस्थित होते. आयुक्त शेखर सिंह म्हणाले पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही शहरातील तरुणांना योग्य नोकऱ्या मिळवून देण्यासाठी मागणी आधारित असा, जास्तीत जास्त उपजीविकेची साधने मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून देण्याचा महत्वपूर्ण प्रकल्प राबवित आहे. तरुणांना खात्रीशीर माहिती, करिअर समुपदेशन, व्यावसायिक कौशल्ये पुरवली जाऊन, नोकरी मिळवण्यासाठी आणि नंतरचेही सहकार्य याद्वारे त्यांना उपजीविका करता येईल. यासाठी व्यावसायिक कौशल्य अभ्यासक्रमांची रचना करुन त्यामध्ये उद्योगांसाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांचाही समावेश केला जाईल, जेणेकरुन तरुणांची रोजगारक्षमता वाढेल असे सांगून कौशल्यम हा एक सहयोगी प्रकल्प आहे जो तरुणांच्या आकांक्षा आणि उद्योगाची मागणी यांच्यातील अंतर कमी करण्याचा प्रयत्न करेल असेही आयुक्त सिंह म्हणाले. लाईटहाऊस कम्युनिटीज फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. गणेश नटराजन यांनी सर्व संबंधितांनी यात सक्रिय सहभाग घ्यावा यावर भर दिला. पुणे, पिंपरी चिंचवड, मुंबई, औरंगाबाद, भुवनेश्वर, कटक आणि हैदराबाद येथील दीड लाख युवकांसोबत यशस्वीपणे प्रकल्प राबवल्यानंतर, आम्हाला या ऐतिहासिक कार्यात भागीदार म्हणून सामील होताना आनंद होत आहे. कौशल्यम साठी सामूहिक जबाबदारी आवश्यक आहे आणि आम्ही या उपक्रमाला पाठिंबा देण्यासाठी आणि तो वाढविण्यासाठी सरकार, देणगीदार, भरती आणि अभ्यासक्रम सामग्रीसाठीचे कॉर्पोरेट भागीदार, तसेच स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांचे समर्थन लाभेल अशी अपेक्षा करतो असे सांगून त्यांनी २०२७ पर्यंत, कौशल्यम त्याच्या विविध कार्यक्रमांद्वारे कमी-उत्पन्न असलेल्या आणि उपेक्षित समुदायातील अंदाजे ३५ हजार तरुणांच्या जीवनावर आणि उपजीविकेवर प्रभाव पाडेल असे मत व्यक्त केले. सर्वसमावेशक प्रवेश: पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि लाईटहाउस कम्युनिटीज फौन्डेशन हे संपूर्ण पिंपरी-चिंचवडमध्ये कौशल्य आणि उपजीविकेसाठी ८ 'लाईटहाऊस' आणि ७ 'लाईटहाऊस कनेक्ट' केंद्रे चालवणार आहेत. ४ लाईटहाऊस केंद्रे पिंपरी, चिंचवड, भोसरी आणि निगडी येथे सध्या आधीच कार्यरत आहेत,

# पिंपरी ते पिंपळे सौदागरपुलाचे काम लवकर पूर्ण करा

## शत्रुघ्न काटे यांच्या प्रशासनाला सूचना

**पिंपरी-चिंचवड**

**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी आज पिंपरी ते पिंपळे सौदागरला जोडणाऱ्या पुलाच्या कामाची पाहणी केली. संबंधित कॉन्ट्रॅक्टर, महापालिका अधिकाऱ्यांसोबत नवीन पुल बांधण्याचे सुरू असलेल्या कामाची पाहणी केली. सद्या वाहतुकीला जुना पुल



अपुरा पडत आहे. त्यामुळे या ठिकाणी सतत वाहतुक कोंडीचा प्रश्न निर्माण होत आहे. कायमस्वरूपी हा प्रश्न मार्गी लावण्याच्या दृष्टीने जुन्या पुलाला संलग्न नवा पुल बांधण्यात येत आहे. नव्याने बांधण्यात येणारा पूल त्यामुळे खूप महत्त्वपूर्ण ठरणार आहे. परिसरात दिवसेंदिवस वाढणारी नागरी लोकवस्ती आणि परिणामी रस्तावर वाढणारी अमर्याद अशी वाहतुकीची साधने याचा मोठा ताण पूर्वी असलेल्या जुन्या पुलावर पडत होता. सदर पूल हा अरुंद स्वरूपाचा असल्यामुळे वाहतूक कोंडी होणे स्वाभाविक होते. यावर तोडगा काढण्यासाठीच याच ठिकाणी रुंद असा पूल बांधण्याचे काम माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांच्या सततच्या पाठपुराव्याने सुरू करण्यात आले. तसेच चौक परिसर सुशोभीकरणाचा एक भाग म्हणून पुलाजवळील दोन्ही मंदिराच्या बाजूने म्युरल्स उभे करण्यात येणार आहे.

# राम मंदिर ही आमची अस्मिता!

## लक्ष्मणभाऊ असते, तर मोठा उत्सव केला असता : फडणवीस

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

आपले स्वप्न ‘रामराज्य’चे आहे आणि मंदिर ही आमची अस्मिता आहे. श्रीराम मंदिराच्या उभारणीमुळे देशात यापुढे रामराज्याची संकल्पना पहायला मिळेल. समाजातील सोशित, पीडित, वंचित आहे. त्याला ज्या राज्यामध्ये महत्व मिळते. त्याचा आवाज ऐकला जातो त्याला ‘रामराज्य’ म्हटले जाते. छत्रपती शिवाजी महाराज यांचे रयतेचे राज्य रामराज्याच्या संकल्पनेतून उभा राहिले होते, अशा भावना राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केल्या. लोकनेते आमदार स्व. लक्ष्मण जगताप यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. तसेच, ‘फिरते वाचनालय’चे लोकार्पणही करण्यात आले. तसेच, प्रभू श्रीराम मंदिराची प्रतिकृती देवून उपस्थित मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. यावेळी राज्याचे आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत, पद्मश्री गिरीश प्रभुणे, चिंचवडच्या आमदार अश्विनी जगताप, भोसरीचे आमदार महेश लांडगे, विधान परिषदेच्या आमदार उमा खापरे, माजी खासदार तथा प्रदेश उपाध्यक्ष अमर साबळे, आमदार भीमराव तापकीर, विश्व हिंदू परिषदेचे दादा वेदक,



> “ पिंपरी-चिंचवडच्या विकासात लोकनेते स्व. लक्ष्मण जगताप यांचा मोलाचा वाटा राहिला आहे. त्यांनी सुरु केलेला लोकसेवेचा वारसा आम्ही सक्षमपणे पुढे नेण्याचा प्रयत्न जगताप कुटुंबीयांकडून केला जात आहे. प्रगती मोठ्या प्रमाणात होत आहे. त्याच प्रमाणात आरोग्याच्या समस्याही वाढत आहेत. दुर्दर रोगांचा उपचार महाग होत असल्यामुळे विविध तपासण्या आणि उपचार सर्वसामान्य नागरिकांना मिळाले पाहिजेत. या उद्देशाने हे शिबीर आयोजित केले आहे. महाराष्ट्रातल्या प्रत्येक व्यक्तीला ५ लाख रुपयांपर्यंतचा उपचार मोफत मिळाला पाहिजे. यासाठी महात्मा फुले जनआरोग्य योजनेची व्याप्ती वाढवली आहे. सामान्य माणसाच्या गरजा पूर्ण झाल्या पाहिजेत.
>
> – **देवेंद्र फडणवीस,** उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

माजी आमदार जगदीश मुळीक, पुण्याचे माजी महापौर मुरलीधर मोहोळ, माजी महापौर माई ढोरे, उपमहापौर नाणी घुले, माजी राज्यमंत्री तथा प्रदेश कार्यकारिणी सदस्य बाळा भेगडे, पिंपरी-चिंचवडचे आयुक्त शेखर सिंह आदी उपस्थित होते. यावेळी देशात संस्कारक्षम पिढी घडवण्यासाठी काम करणारी भारतीय विचार साधना संस्थेला मदत म्हणून ‘संस्कारक्षम विचार रथ’ ची चावी अध्यक्ष बिपिन पाटसकर यांना सुपूर्द करण्यात आली. आमदार अश्विनी जगताप म्हणाल्या की, सर्वसामान्य नागरिकांच्या हक्कांसाठी स्वाभिमानाने लढणारे आमदार लक्ष्मण जगताप यांना एका दुर्दर आजाराने आमच्यातून हिरावून घेतले. ‘‘गोरगरिब नागरिकांना आरोग्य सुविधा मिळावी. उपचार आणि निदानाअभावी कोणीही नागरिक वंचित राहता कामा नये.’’ या भावनेतून आम्ही ९ वर्षांपूर्वी ‘अटल महाआरोग्य शिबीर’ या पवित्र कार्याची सुरूवात केली. लाखो लोकांनी आतापर्यंत याचा लाभ घेतला आहे. शहराध्यक्ष शंकर जगताप व स्व. लक्ष्मण जगताप मित्र परिवाराने या शिबिरासाठी प्रचंड मेहनत घेतली आहे.

भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप म्हणाले की, २०१७ मध्ये महापालिकेत भाजपा सत्ता आली. पूर्वी वायसीएम महापालिकेत नियमितपणे १ हजारापर्यंत रुग्णांची तपासणी होत असे. मात्र, भाजपाच्या सत्ताकाळात नियमितपणे ५ हजार रुग्णांची तपासणी केली जात आहे. मोठ्या आजारांवर उपचार करण्यासाठी खासगी रुग्णालयात जावे लागते. भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप म्हणाले की, शिबिरामध्ये आतापर्यंत ऑनलाईन दीड लाख आणि ऑफलाईन ३७ हजार रुग्णांची नोंद झाली आहे. पहिल्या दिवशी ६६ हजार रुग्णांची तपासणी झाली आहे. सुमारे ६५० लोकांचे एक्स-रे, १९५ सोनोग्राफी, सुमारे १५ हजार विद्यार्थ्यांची तपासणी, डायलेसिसच्या सुमारे १ हजार ५०० रुग्णांची तपासणी केली आहे. लोकनेते स्व. लक्ष्मण जगताप यांचा रुग्णसेवेचा वसा आम्ही निरंतरपणे सुरू ठेवणार आहे. स्व. जगताप यांच्याप्रमाणेच जगताप कुटुंबीय भाजपा पक्षनिष्ठा जोपासणार आहे.अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिराचे उद्घाटन होत आहे. हे केवळ मंदिर नाही, ५०० वर्षे जो कलंक आमच्या छातीवर उभा केला होता. ज्या कलंकाला १९९२ साली मिटवले. तरीदेखील आमच्या आराध्य दैवताची स्थापना आम्हाला करता आली नव्हती. ज्या ठिकाणी प्रभू श्रीरामांचा जन्म झाला होता. तिथेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते प्रभूंच्या मंदिराचे लोकार्पण होत आहे. त्यामुळे सर्वत्र मंगलमय वातावरण आहे. आज लोकनेते लक्ष्मण जगताप असते, तर त्यांनीही मोठा उत्सव साजरा केला असता. त्यांचे कार्य सक्षमपणे पुढे नेण्याची शक्ती प्रभू श्रीराम आम्हाला देतील, अशा भावनाही फडणवीस यांनी व्यक्त केल्या. रामराज्याच्या संकल्पनेमुळे काही लोकांना दु:ख होते. त्यामुळे काही वाचाळवीर राम मांसाहारी होते, असे वाचाळ वक्तव्य करतात. आमचे वारकरी, टाळकरी, धारकरी सर्व बहुजन समाज आहे. सगळे शाकाहारी आहेत. त्यामुळे वाचाळवीरांना प्रभू श्रीराम सुबुद्धी देतील. ‘पुरुषार्थ जागृत करुन वाईट प्रवृत्तीवर आपण विजयी मिळवू शकतो’ अर्थात सामान्यांना सोबत घेवून वाईटाशी लढाई करतो. सामान्यांचा पौरुष जागृत करतो. प्रभू श्रीराम लोकनेते लक्ष्मण जगताप यांचे कार्य पुढे नेण्याची शक्ती आम्हाला देतील, असा विश्वासही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

# पुणे मेट्रो मार्गिकांचे विस्तारीकरण लवकरच होणार : अजित पवार

## मेट्रो मार्गिकांचे विस्तारीकरण करण्याची केली सूचना





**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
शहरातील तिन्ही मेट्रो मार्गिकांचे विस्तारीकरण करण्याची अशी सूचना अजित पवार यांनी केली. स्वारगेट-कात्रज आणि पिंपरी-निगडी मेट्रो मार्गिकांच्या विस्तारीकरणासंदर्भात महामेट्रो, राज्य शासन आणि केंद्र सरकार यांच्यात त्रिपक्षीय करार करावा आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मेट्रो मार्गिकांच्या विस्तारीकरणाचा तांत्रिक अहवाल तयार करावा. त्यासाठी सल्लागार नियुक्त करावा, असेही पवार यांनी स्पष्ट केले. अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात उपमुख्यमंत्र्यांच्या प्रकल्प सनियंत्रण कक्षाची बैठक झाली. त्या वेळी मेट्रो प्रकल्पाचा आढावा पवार यांनी घेतला. विभागीय आयुक्त सौरभ राव, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, महापालिका आयुक्त विक्रम कुमार, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख या वेळी उपस्थित होते. पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मेट्रो मार्गिकांच्या कामांना गती द्यावी, अशी सूचना त्यांनी या वेळी केली. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील सार्वजनिक वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या मेट्रो मार्गिकांचे विस्तारीकरण करण्याची सूचना त्यांनी केली. वनाज ते रामवाडी या मेट्रो मार्गिकेची प्राथमिक चाचणी झाली आहे. या मार्गातील दोन ते तीन खांब वाहतुकीच्या दृष्टीने अडचणीचे ठरत आहेत. त्यामुळे अतिरिक्त जमिनीची मागणी महामेट्रोच्या अधिकाऱ्यांनी केली. त्यासाठी तातडीने जागा द्यावी, अशी सूचना पवार यांनी केली. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्वारगेट ते लोणी काळभोर, हडपसर ते खराडी तसेच रामवाडी ते वाघोली मेट्रो मार्गिकांच्या विस्तारीकरणाचे अहवाल तातडीने करण्यात यावेत, शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रो मार्गिकेअंतर्गत राजभवन येथे पादचाऱ्यांसाठी उड्डाणपूल उभारण्यात यावा, असेही त्यांनी सांगितले. या सुधारणांनुसार मेट्रो प्रकल्पाच्या सुधारित प्रकल्प किमतीस केंद्रीय नगरविकास विभागाची मान्यता आवश्यक आहे. याबाबत केंद्रीय मंत्र्यांबरोबर चर्चा करून याबाबतच्या अडचणी सोडविण्यात येतील, असे आश्वासन पवार यांनी दिले. अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात उपमुख्यमंत्र्यांच्या प्रकल्प सनियंत्रण कक्षाची बैठक झाली. त्या वेळी मेट्रो प्रकल्पाचा आढावा पवार यांनी घेतला. विभागीय आयुक्त सौरभ राव, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, महापालिका आयुक्त विक्रम कुमार, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख या वेळी उपस्थित होते. पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मेट्रो मार्गिकांच्या कामांना गती द्यावी, अशी सूचना त्यांनी या वेळी केली. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील सार्वजनिक वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या मेट्रो मार्गिकांचे विस्तारीकरण करण्याची सूचना त्यांनी केली. वनाज ते रामवाडी या मेट्रो मार्गिकेची प्राथमिक चाचणी झाली आहे. या मार्गातील दोन ते तीन खांब वाहतुकीच्या दृष्टीने अडचणीचे ठरत आहेत. त्यामुळे अतिरिक्त जमिनीची मागणी महामेट्रोच्या अधिकाऱ्यांनी केली. त्यासाठी तातडीने जागा द्यावी.

# गुंड मोहोळच्या हत्येनंतर फडणवीस यांची प्रतिक्रिया

## सुव्यवस्थेचाही प्रश्न निर्माण होणार नाही : फडणवीस



**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
कोथरुडमधील गुंड शरद मोहोळ याच्यावर गोळीबार करून त्याची हत्या करण्यात आली आहे. यावर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, या घटनेमुळे राज्यात कुठेही टोळीयुद्ध होणार नाही, तसेच कायदा व सुव्यवस्थेचाही प्रश्न निर्माण होणार नाही. सदर कुख्यात गुंडाची हत्या त्याच्याच साथीदारांनी केली आहे. गुंड कुणीही असो, त्याचा बंदोबस्तच शासनाद्वारे केला जातो. त्यामुळे असे टोळीयुद्ध करण्याचा कुणीही प्रयत्न करणार नाही. संवाद साधत असताना उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विविध विषयांवर भाष्य केले. रोहित पवार यांच्या कंपनीवर ईडीने केलेल्या कारवाईबाबत बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, विनाकारण स्वतःला शहीद घोषित करण्याचे प्रकार सुरू आहेत. त्यांच्या कंपनीवर छापा पडला अशी माहिती मिळत आहे, त्याच्या खोलात मी गेलेलो नाही. त्यांचा व्यवसाय आहे. व्यवसायात अशा वेगवेगळ्या गोष्टी होत असतात. त्यांनी काही केले नसेल, तर काही होणारही नाही. विनाकारण घाबरण्याची गरज नाही. राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी दोन दिवसांपूर्वी केलेल्या वादग्रस्त विधानावरही फडणवीस यांनी भाष्य केले. ते म्हणाले, जितेंद्र आव्हाड यांचे वक्तव्य मुर्खपणाचे होते. 'बदनाम हुए तो क्या हुआ नाम तो हुआ..', अशाप्रकारचा त्यांचा स्वभाग आहे. खरं म्हणजे प्रभू श्रीराम हे सर्वांचेच आहेत. ते बहुजनांचे, अभिजनांचे, आदिवासींचे, दलितांचे अशा सर्वांचेच आहेत. ते शाकाहारी होते की मांसाहारी, या विषयात पडण्याची गरज नाही. ज्यांची प्रभू श्रीरामावर श्रद्धा आहे, अशा लोकांच्या भावनाना दुखावण्याचे काम विनाकारण केले जात आहे. आमचे वारकरी, धारकरी, टाळकरी हे सर्व बहुजन असून ते सर्व शाकाहारी आहेत, या सर्वांचा यातून अपमान नाही का झाला? विनाकारण विवाद निर्माण करून लोकांच्या भावना दुखावून राज्यात अशांतता निर्माण करण्याचे काम केले जात आहे. तसेच जे लोक स्वतःला हिंदुत्ववादी असल्याचे म्हणत होते, त्यांनी साधलेले मौन त्यांची बेगडी वृत्ती दाखवून देत आहे, असा आरोप देवेंद्र फडणवीस यांनी केला. आज, शुक्रवारी, ५ जानेवारी रोजी दुपारी शरद मोहोळ जेव्हा घरातून बाहेर पडला तेव्हा विठ्ठल गांडले, नितीन कानगुडे आणि साहील पोळेकर हे त्याचे साथीदार बॉडीगार्ड म्हणून त्याच्यासोबत चालायला लागले. पण आपले बॉडीगार्डच आपला थोड्याच वेळात शेवट करणार आहेत याची शरद मोहोळला पुसटशी देखील कल्पना नव्हती.

# सुनील कांबळे वादग्रस्त वक्तव्य आणि दादागिरीसाठी प्रसिद्ध

## अजित पवारांच्या उपस्थितीत कांबळेंची दादागिरी : सुषमा अंधारे

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पुण्यातील भाजपाचे आमदार सुनील कांबळे यांनी एका पोलीस कर्मचाऱ्याला आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ( अजित पवार गट ) पदाधिकारी राजीव सातव यांना कानशिलात लगावल्याचा धक्कादायक हा सगळा प्रकार समोर आला आहे. हा सगळा प्रकार उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत घडला आहे. यानंतर सुनील कांबळे यांनी मारहाण केली नसल्याचं सांगत सारवासारव केली. आता, शिवसेना ( ठाकरे गट ) उपनेत्या सुषमा







अंधारे यांनी सुनील कांबळे यांच्यासह भाजपावर टीका केली आहे. पुण्यातील ससून रूग्णालयात विविध वॉर्डचं उद्घाटन अजित पवारांच्या हस्ते झालं. यावेळी महिला प्रदेशाध्य७ रूपाली चाकणकर, खासदार सुनील तटकरे, मंत्री हसन मुश्रीफ, आमदार रवींद्र धंगेकर, भाजपा सुनील कांबळे उपस्थित होते. यावेळी मंचावरून खाली उरत असताना कार्यरत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्याला कानशिलात लगावली. त्यापूर्वी सुनील कांबळेंनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ( अजित पवार गट ) वैद्यकीय कक्षाचे पदाधिकारी जितेंद्र सातव यांना देखील कानाखाली मारल्याची घटना घडली होती. यावर सुषमा अंधारे म्हणाल्या, सुनील कांबळे वादग्रस्त वक्तव्य आणि दादागिरीसाठी प्रसिद्ध आहेत. दोन वर्षापूर्वी पुणे महापालिकेतील महिला अभियंत्याला अत्यंत अभद्र भाषेत सुनील कांबळेंनी शिवीगाळ केली होती. तर, बिल्डरच्या फायद्यासाठी आनंदनगर येथील रहिवाश्यांना सुनील कांबळेंनी दमदाटी केली होती. आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत कांबळेंनी दादागिरी केली आहे. पहिल्याच प्रकरणात कांबळेंना समज देत कारवाई झाली असती किंवा निलंबन झाले असते, तर पुन्हा असे करण्याची हिंमत झाली नसती. भाजपा अशा आमदारांचं कधीही निलंबन करत नाही. उलट भाजपाच्या आमदारांनी मारहाण करावी, हातपाय तोडावे, पत्रकारांना जीवे मारण्याच्या धमक्या द्याव्यात, महिला अधिकाऱ्यांना अभद्र भाषा वापरावी. पण, याबाबत गृहखाते कुठलीही हालचाल करणार नाही, असं म्हणत सुनील कांबळे प्रकरणावरून सुषमा अंधारेंनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांवर हल्लाबोल केला आहे. सुनील कांबळेंनी पोलीस कर्माचाऱ्याच्या मारहाणीबद्दल स्पष्टीकरण दिलं आहे. मी कार्यक्रम झाल्यावर मंचावरून खाली येत होता. त्यावेळी पायऱ्या उतरताना एक व्यक्ती अचानक समोर आल्यानं मी पडलो असतो. त्यामुळे मी त्या व्यक्तीला बाजूला सारलं आणि खाली उतरलो. मी त्याच्या कानशिलात लगावली नाही.

# पुण्यातील समाविष्ट गावांमधील शाळांसाठी शिक्षक भरती

## रिक्त ३५५ जागांची भरती प्रक्रिया सुरू

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

महापालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या शाळांसह जुन्या हद्दीतील शिक्षकांच्या रिक्त ३५५ जागा भरण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे. त्यासाठीच्या बिंदुनामावलीस अंतिम मान्यता मिळविण्यासाठी हा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात आला असून पवित्र पोर्टलच्या माध्यमातून शिक्षक भरती प्रक्रिया महापालिका प्रशासनाकडून राबविण्यात येणार आहे. महापालिकेच्या मराठी, इंग्रजी, उर्दू आणि कन्नड माध्यमाच्या शाळा आहेत. या शाळांमधून सव्वा लाख विद्यार्थी शिक्षण घेत असून अनेक वर्षात शिक्षक भरती न झाल्याने शिक्षकांची संख्या अपुरी आहे. शिक्षकांअभावी एकाच शिक्षकांवर दोन-दोन वर्गांची जबाबदारी देण्यात आली असून त्याविरोधात पालक, शिक्षकांनी आंदोलनेही केली आहेत. महापालिकेकडील आकडेवारीनुसार शिक्षकांच्या ६५० जागा रिक्त आहेत. मात्र राज्य शासनाने रजा मुदतीमधील ९३ शिक्षकांना कायम करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच आंतरजिल्हा



बदली पद्धतीनुसार काही शिक्षक महापालिकेला मिळाले आहेत. त्यामुळे सध्या रिक्त जागांची संख्या ३५५ एवढी आहे. ही पदभरती येत्या काही दिवसांत केली जाणार आहे. शिक्षण विभागातील शिक्षकांची बिंदुनामावली तयार करून ती राज्य शासनाकडे महापालिकेने मंजुरीसाठी पाठवली आहे. राज्य शासनाने उर्दू आणि कन्नड माध्यमाच्या शिक्षकांची बिंदुनामावली मंजूर केली आहे. मात्र, मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या शिक्षकांची बिंदुनामावली मंजूर झालेली नाही. येत्या काही दिवसांत त्याला मंजुरी मिळेल. त्यानंतर पवित्र पोर्टलच्या माध्यमातून भरती प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याचे अतिरिक्त आयुक्त रवींद्र बिनवडे यांनी सांगितले. दरम्यान, जुन्या हद्दीतील शाळांबरोबरच समाविष्ट गावांनाही पदभरतीनंतर शिक्षक दिले जाणार आहेत. समाविष्ट गावांतील ६५ पैकी ६१ शाळांचे महापालिकेकडे हस्तांतरण करण्यात आले आहे. उर्वरित शाळा येत्या काही दिवसांत हस्तांतरित होणार आहेत.

महापालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या शाळांसह जुन्या हद्दीतील शिक्षकांच्या रिक्त ३५५ जागा भरण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे. त्यासाठीच्या बिंदुनामावलीस अंतिम मान्यता मिळविण्यासाठी हा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात आला असून पवित्र पोर्टलच्या माध्यमातून शिक्षक भरती प्रक्रिया महापालिका प्रशासनाकडून राबविण्यात येणार आहे. महापालिकेच्या मराठी, इंग्रजी, उर्दू आणि कन्नड माध्यमाच्या शाळा आहेत.